

Reviews of Literature
ISSN No : 2347-2723
International Recognized Multidisciplinary Research Journal

ISSN 2347-2723 Impact Factor : 2.0210 (UIF) [Yr.2014] Volume - 3 | Issue - 6 | Jan - 2016





# शिळीमकर व बांदल घराण्याच्या स्वराजाच्या कार्यातील योगदानाचा अभ्यास

प्रा.गोरख विठ्ठल रुपनवर
दौंड तालुका कला, वाणिज्य, महाविद्यालय, दौड,जि.पुणे.

## १ .प्रस्तावना:—

छत्रपती शिवाजी महाराजांना स्वराज्य स्थापनेच्या प्रारंभीच्या काळात मावळातील देशमुख व त्यांच्या सैन्याची खूपच मदत झाली. या मंडळींना आपलेसे करण्यासाठी शिवाजीराजांना रोहिड खोऱ्याच्या भोर तरफेचे देशमुख कान्होजी जेधे यांच्याप्रमाणेच बाजी सर्जेराव जेधे, बाजी पासलकर, बापुजी मुदगल, बाजी बांदल, बाजीप्रभू देशपांडे, येसाजी कंक, तानाजी व सुर्याजी मालसुरे, कावजी कोंढाळकर, कावजी मल्हार, दादाजी नरसप्रभू, नारोबापूजी ,बालाजी बापूजी, चिमणाजी बापूजी, जिवा महाले, संभाजी कावजी, हैबतराव शिळीमकर, बाबाजी झुंजारराव मरळ देशमुख इत्यादी मंडळींचे बहुमोल सहकार्य लाभले. याशिवाय मावळ खोऱ्यातील काटक, चलाख व निष्ठावंत मावळे हेच राजांच्या लष्करातील पायदळाचे व घोडदळाचे आधारस्तंभ बनले. नेताजी पालकर, सुर्यराव काकडे, वाघोजी तुपे, गोदाजी जगताप, हिरोजी इंगळे, तुकाजी पोळ, सदाजी घाटगे, रामाजी पांगरे,तुकोजी चोर, काताजी इंगळे, कोंडाजी कंक कृष्णाजी गायकवाड, सुरजी कांटके, विसाजी मुलंबक, संभाजी करवर,इब्राहीम सिद्दी, इत्यादी सर्वसामान्य मावळयातील सेनाजींनी प्रारंभीच्या युद्धप्रसंगात शिवाजी महाराजांना मोलाची साथ दिली. त्यापैकी शिळीमकर, बांदल घराण्यातील शिवाजी महाराजांच्या सहकार्यांच्या कार्याचा परामर्श सदरच्या लेखात घेण्यात आला आहे.

## २ .शिळीमकर घराण्याचे स्वराज्य निर्मितीतील योगदान

भोरजवळील गुंजणमावळचे शिळीमकर हे देशमुख घराणे शिवाजी महाराजांच्या स्वराज्यकार्यात प्रथमपासूनच सहभागी झाले होते.गुंजणमावळच्या देशमुखांना “हैबतराव ” हा किताब होता.शिवाजी महाराजांच्या अगोदरपासूनच शिळीमकर घराण्यात देशमुख वतनावरुन वाद सुरु होता. सन १६३८ मध्ये दादोजी कोंडदेव यांनी या वतनाचे ४ भाग करुन, त्यापैकी दोन भाग बापूजी शिळीमकर यांना, एक भाग हाबाजी शिळीमकर यांना देवून या दोघांनाही देशमुखीच्या कारभाराचा अधिकार दिला होता. त्यामुळे या दोघांनाही ‘हैबतराव’ किताब प्राप्त झाला होता. परंतु देशमुखीच्या कारभाराचा हक्क त्याला दिला नव्हता. त्यामुळे कागदोपत्री ‘बालाजी नाईक शिळीमकर’ असा त्याचा उल्लेख आढळतो. दादोजी कोंडदेव यांनी हा वाद सोडविला असला तरी तो कायमचा मिटला नाही. शिवाजी महाराजांच्या स्वराज्यस्थापनेच्या कार्याला सुरुवात केल्यानंतर कान्होजी जेध्यांबरोबर शिळिमकरही या कार्यात सहभागी झाले. सन १६४८ च्या

फत्तेखानाच्या स्वारीच्या वेळी शिळीमकर देशमुखांनी मोठाच पराक्रम गाजविला. या युद्धातील त्यांच्या पराक्रमाचे पारितोषिक म्हणून शिवाजी महाराजांनी "बापूजी हैबतराव,हाबाजी हैबतराव, बालाजी नाईक या तिघांना चिंचले बुद्रुक हे गाव इनाम म्हणून दिले. सन १०६१(२४ मे १६५० ते २३ मे १६५१) मध्ये दिलेल्या या इनामपत्रात म्हटले आहे की, बापुजी हैबतराव, व बालाजी नाईक शिळिमकर या गुंजणमावळाच्या देशमुखांनी गलबल्यामध्ये आपले जमेतीनेसी साहेबांचे मसलतीस यंवून एक तरी केली. त्यामुळे त्यांच्यावर कृपा करुन चिंचाळे बुद्रुक हे गाव त्यांना इनाम दिले आहे" सन १६५६ च्या जावळी मोहिमेत शिळिमकर सहभागी झाले होते. महाराजांनी जावळी जिंकल्यानंतर चंद्रराावाने रायरी किल्ल्यावर आश्रय घेतला होता. शिवाजी महाराजांनी रायरीला वेढा दिला व हल्ले करुन चंद्ररावाला जेर केला. शेवटी हैबतराव व बालाजी नाईक शिळिमकर यांच्या मध्यस्थीने चंद्रराव शरण आला. जावळी विजयानंतर हाबाजी हैबतरावाने आपल्या देशमुखीच्या वाटणीसंबंधीची तक्रार महाराजांकडे केली. तेव्हा महाराजांनी स्वत: गोतसभेत बसून २१ मार्च १६५७ रोजी या प्रकरणाचा निवाडा केला.

अफजलखानाच्या स्वारीच्या प्रसंगी शिवाजी महाराजांनी हैबतराव व बालाजीनाईक शिळिमकर यांच्यावर एक घाट अडवून धरण्याची कामगिरी सोपविली होती. अफजलखान वधानंतर हैबतराव शिळिमकराचा सासरा रोहिड खोऱ्याचा देशमुख खंडोजी हा पळून गेला होता.त्याने आपला जावई हैबतरावांना महाराजांचे अभय मिळवून देण्याची विनंती केली. हैबतराव शिळिमकरांनी कान्होजी जेध्यांच्या मध्यस्थीने खंडोजी खोपडे याला महाराजांचे अभय मिळवून दिले. परंतु खंडोजी अफजल खानाला सामील झाल्याचा राग महाराजांच्या मनातून गेला नव्हता. त्यामुळे नंतरच्या काळात महाराजांनी खंडोजी खोपडयाचा उजवा हात व डावा पाय कापून फितुरीबद्दल शिक्षा दिली. परंतु त्याचे वतन मात्र त्याच्याकडेच ठेवले. अशाप्रकारे शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेच्या प्रारंभीच्या काळात शिळिमकर सरदारांनी महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे.

### ३. बांदल घराण्याचे स्वराज्यनिर्मितीतील योगदानः—

हिरडस मावळची देशमुखी असलेल्या बांदल घराण्यानेही प्रारंभीच्या काळात शिवाजी महाराजांना सहकार्य केले. या घराण्यातील कृष्णाजी बांदलने मात्र सुरुवातीला दादोजी कोंडदेवांना विरोध केल्याचे दिसले. कृष्णाजी बांदल हा मलिक अंबरच्या काळापासून मावळ प्रांतात पुंडावा करीत होता. तो बारा मावळमध्ये जबरदस्तीने वसुली करत असे. हिरडस मावळ रोहिडे खोऱ्याच्या भोर तरफेला लागून असल्यामुळे भोर तर्फेचे देशमुख कान्होजी जेधे व कृष्णाजी बांदल यांच्यात तंटा आणि काही वेळा झटापटीही झाल्या होत्या. शहाजी राजांनी कान्होजी जेधे यांना आपल्या बाजूने वळविल्यामुळे मावळातील इतरही देशमुख— देशपांडे मंडळी हळूहळू महाराजांकडे रुजू होवू लागली. परंतू कृष्णाजी बांदल महाराजांना मानावयास तयार नव्हता तेव्हा दादोजी कोंडदेवांनी याबाबत शहाजी राजांचा सल्ला घेतला. शहाजी राजांनी हुकुम पाठविला की,'हातात येईल असे करावे' दादोजी कृष्णाजीवर हिरडस मावळात चालून गेले. या मोहिमेत दादोजी कोंडदेव यांना पराभव पत्करावा लागला. यानंतर दादोजींनी शपथपूर्वक बेलभंडार पाठवून कृष्णाजीस भेटीला बोलाविले व तो भेटीला आल्यावर कोंढाणा किल्ल्यावर धरुन नेऊन चौरंग केले. अशाप्रकारे दादाजीने कृष्णाजी बांदलाचा बंदोबस्त केला. कृष्णाजीला शिक्षा झाल्यानंतर त्याची पत्नी दिपाई आपला मुलगा बाजी याला घेवून परागंदा झाली. पुढे तिने बाजीला आपला नातेवाईक साबरची निंबाळकर यांच्याकडे पाठविले. तिथे त्याने युध्दात पराक्रम केला. हे समजल्यावर शहाजी राजांनी त्याला भेटीला बोलाविले व अभय देवून देशमुखी करण्यास पाठविले.

बाजी बांदल आणि त्याची आई दिपाई यांनी स्वराज्य कार्यात महाराजांना पूर्ण सहकार्य केले. सन १६४८ च्या फत्तेखानाच्या स्वारीत बाजीने मोठाच पराक्रम गाजविला. या त्याच्या कामगिरीबद्दल शिवाजी महाराजांनी मौजे भाणसदरे हे गाव इनाम देवून ते त्यांच्याकडे वंशपरंपरेने चालवावे असा हुकूम दिला. बाजी बांदल ची आई दिपाई ही मोठी कर्तृत्वान स्त्री होती. कृष्णाजीच्या मृत्यूनंतर तीच हिरसड मावळच्या देशमुखीचा कारभार चालवीत होती. फत्तेखानावरील स्वारीत बाजीप्रमाणेच जमावनीशी मातुश्री दिपाई गेली व या युध्दात बांदलांचे २५० लोक ठार झाले असे बांदलांच्या एकातकरीरीत म्हटले आहे. याशिवाय दिपाई व बांदलाच्या जमावाचा सरनौबत बाजीप्रभू देशपांडे यांना शिवाजी महाराजांनी जावळीवर रवाना केले. या युध्दात त्यांनी मोठा पराक्रम केला. ओही या तकरीरीत म्हटले आहे. वेळवंड खोऱ्याच्या

देशमुखीच्या वडीलपणासबंधीच्या तंय्याचा निवाडा शिवाजी महाराजांच्या उपस्थितीत झाला. या निवाडाच्या हाजिर मजालसीत दिपाई हजर असल्याचे दिसते. या मजहरात तिचा दिपाई आवा देशमुखीन ता हिर्डस मावळ असा उल्लेख आढळतो. अशा प्रकारे कृष्णाजी बांदल देशमुखाने जरी सुरूवातीला दादोजी कोंडदेवांना विरोध केला असला तरी पुढील काळात त्यांचा मुलगा व पत्नी दोघेही स्वराज्यकार्यात सहभागी झालेले दिसतात.

## समारोप

छत्रपती शिवाजी महाराजांची स्वराज्य स्थापना ही १७ व्या शतकातील एक अपूर्व व अलौकिक घटना आहे. शिवाजी राजांनी कधी गोडीगुलाबीने तर कधी दहशतीने अनेक देशमुख देशपांडे मंडळींना आपल्या बाजूने वळवले. विरोध करणाऱ्या मुजोर वतनदारांचा बिमोड केला. शिवाजी राजांना सहकार्य करण्याच्या कामी कान्होजी जेधे यांनी पहिले पाऊल उचलले आणि त्यापाठोपाठ शिळिमकर, बांदल इत्यादी देशमुख व इतर वतनदार मंडळींही महाराजांना सामील झाली. मावळातील या सहकाऱ्यांनी शिवाजीराजांना आयुष्यभर साथ दिली. त्यांच्या मनात शिवाजीमहाराजांच्या बद्दल अलौकिक एकनिष्ठा होती. या सहकाऱ्यांनी प्राणाची पर्वा न करता स्वराज्य कार्य केले. अशा पराक्रमी, शूर, स्वाभिनिष्ठ सहकाऱ्यांमुळेच शिवाजी महाराजांचे स्वराज्य स्थापनेचे कार्य सोपे झाले.

## संदर्भग्रंथ सुची


१. राजवाडे वि. का.(२००२) मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड ३ राजवाडे संशोधन मंडळ, धुळे, लेख क्रमांक – ०७
२. तत्रैव. लेख क्रमांक – ०९.
३. कुलकर्णी अ. रा. (२००७) "जेधे शकावली – करीना" डायमंड पब्लिकेशन्स पुणे, पान नं – २१.
४. कुलकर्णी अनुराधा गोविंद (२०११) "शिवछत्रपतींची पत्रे खंड – २" परममित्र पब्लिकेशन्स, ठाणे पान नं २१३.
५. कुलकर्णी अ. रा. उपरोक्त पान नं – २११.
६. पोतदार दत्तो वामन, मुजुमदार ग. ना. (१९३०) संपादक " शिवचरित्र साहित्य खंड – २" भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, पान नं – २२९.
७. देशमुख विजय (१९८०) "शककर्ते शिवराम (पूर्वार्ध)" छत्रपती सेवा प्रतिष्ठान, नागपुर, पान नं – १६८.
८. कुलकर्णी अनुराधा गोविंद, उपरोक्त, पत्र क्रं – १ पान नं – ११.पान नं – ३५.
९. कुलकर्णी अनुराधा गोविंद ( २०१२ संपादक ) " शिवचरित्र साहित्य खंड – १५ " डायमंड पब्लिकेशन पुणे , पान नं १४९